महाराष्ट्र शासन

# महिला व बाल विकास विभाग

## महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१

## सरळसेवा भरती जाहिरात क्रमांक ०१/२०२४

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील **(१)** संरक्षण अधिकारी, गट- ब (अराजपत्रित)- २ पदे **(२)** परिविक्षा अधिकारी,गट-क ७२ पदे **(३ )** लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क १ पद **(४)** लघुलेखक (निम्नश्रेणी), गट-क २ पदे **(५)** वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक, गट-क ५६ पदे **(६)** संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क ५७ पदे **(७)** वरिष्ठ काळजी वाहक, गट-ड ४ पदे **(८)** कनिष्ठ काळजी वाहक, गट-ड ३६ पदे **(९)** स्वयंपाकी, गट-ड ६ पदे भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील निम्न नमुद सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर सरळसेवा भरती प्रक्रियेशी संबधित सविस्तर जाहिरात व ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची सुविधा महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे च्या https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर दिनांक १४-१०-२०२४ पासुन सरळसेवा भरती २०२४ या मथळयाखाली उपलब्ध करुन दिली आहे. उमेदवारांनी संपुर्ण जाहिरात काळजीपुर्वक वाचुन केवळ ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज सादर करावेत. प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता केवळ उक्त संकेस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज व ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेले परीक्षाशुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज/परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येणार नाही.

भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व कार्यक्रम वेळापत्रक, वेळापत्रकातील बदल इत्यादी सूचना https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. सदर भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांशी कोणताही स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करण्यात येणार नसून, सदर संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांची दखल घेवून त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

| | |
|---|---|
| **ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा सुरवात दिनांक** | **दिनांक १४-१०-२०२४ दुपारी १५.०० वाजेपासून** |
| **ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ०३-११-२०२४ रात्री २३.५५ वाजेपर्यंत** |

उक्त भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण किंवा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, सामाजिक, समांतर, दिव्यांग व इतर सर्व आरक्षणामध्ये संवर्गनिहाय/पदनिहाय बदल करण्याचे, सरळ सेवा भरती प्रक्रियेच्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे/नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे/अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी राखुन ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम राहील. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील. त्याबाबत उमेदवारांना कोणताही हक्क/दावा सांगता येणार नाही.

## सरळसेवेच्या कोटयातुन गट ब (अराजपत्रित) गट- क व गट- ड या संवर्गातील भरती करावयाची पदे

### पद:-संरक्षण अधिकारी, गट -ब (अराजपत्रित) (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-१४:३८६००-१२२८००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची एकूण पदे | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

### पद:- लघुलेखक (उच्चश्रेणी),गट-क (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-१६:४४९००-१४२४००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची एकूण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

## पद:- लघुलेखक (निम्नश्रेणी), गट-क (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-१५:४१८००-१३२३००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची एकूण पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

## पद:- परिवीक्षा अधिकारी, गट-क (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-१४:३८६००-१२२८००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची एकूण पदे | ५ | ३ | ० | १ | ० | २ | १ | १६ | ७ | ७ | ३० | ७२ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | |
| २ | सर्वसाधारण | १ | २ | ० | १ | ० | १ | १ | ५ | ३ | ३ | ८ | २५ |
| ३ | महिला | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | ५ | २ | २ | ९ | २२ |
| ४ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| ५ | माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ५ | १० |
| ६ | अंशकालीन पदवीधर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ३ | ८ |
| ७ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ८ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| ९ | दिव्यांग | १ पद- अल्पदृष्टी (Low Vision) ,<br>१ पद- कर्णबधीर १ (Hard of Hearing)<br>१ पद - (अल्पदृष्टी (Low Vision) /कर्णबधीर (Hard of Hearing)/अस्थीव्यंगता/मेंदुचा पक्षाघात (Cerebral Palsy)/कुष्ठरोगमुक्त (leprosy cured/शारीरीक वाढ खुंटणे (Dwarfism)/आल्म हल्लाग्रस्त (Acid Attack Victim/स्थायु विकृती (Muscular dystrophy) यामधील बहिरेपणा व अल्पदृष्टीसह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | |
| १० | अनाथ | १ पद (संस्थात्मक प्रवर्ग ) | | | | | | | | | | | |

**पद:-वरिष्ठ लिपीक /सांख्यिकी सहायक, गट-क (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-८:२५५००-८११००)**

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची एकूण पदे | ५ | २ | २ | १ | २ | ० | २ | १२ | ६ | ६ | १८ | ५६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | | |
| २ | सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | ० | १ | ३ | २ | २ | ६ | १९ |
| ३ | महिला | २ | १ | १ | ० | १ | ० | १ | ४ | २ | २ | ५ | १९ |
| ४ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ५ | माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ३ | ८ |
| ६ | अंशकालीन पदवीधर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ६ |
| ७ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ९ | दिव्यांग | १ पद अल्पदृष्टी<br>१ पद कर्णबधीर | | | | | | | | | | | |
| १० | अनाथ | १ पद (संस्थात्मक प्रवर्ग) | | | | | | | | | | | |

## संवर्ग - संरक्षण अधिकारी (कनिष्ठ ),गट-क (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-६:१९९००-६३२००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ. (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची एकूण पदे | ४ | २ | १ | १ | १ | १ | २ | ११ | ६ | ६ | २२ | ५७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | | |
| २ | सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | २ | २ | ८ | २३ |
| ३ | महिला | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ३ | २ | २ | ७ | १७ |
| ४ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ५ | माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ३ | ८ |
| ६ | अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ५ |
| ७ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| | दिव्यांग | **उपरोक्त पदसंख्येपैकी** OA(One Arm)\OL(One Leg)\OAL (One Arm and One Leg)\ LC(Leprosy Cured)\ DW(Dwarfism)\ AAV(Acid attack Victim) या दिव्यांग प्रवर्गासाठी १ पद राखीव आहे<br>(अल्पदृष्टी (Low Vision) /कर्णबधीर (Hard of Hearing)/अस्थीव्यंगता/मेंदुचा पक्षाघात (Cerebral Palsy)/कुष्ठरोगमुक्त (leprosy cured/शारीरीक वाढ खुंटणे (Dwarfism)/आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victim/स्नायु विकृती (Muscular dystrophy) यामधील **बहिरेपणा व अल्पदृष्टीसह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व** असणाऱ्यासाठी 1 पद राखीव आहे. | | | | | | | | | | | |
| | अनाथ | **उपरोक्त पद संख्येपैकी 1 पद संस्थात्मक अनाथ प्रवर्गासाठी राखीव आहे** | | | | | | | | | | | |

**टिप-**

संरक्षण अधिकारी (कनिष्ठ),गट-क या पदाची जिल्हानिहाय रिक्त पदांची माहिती भरती प्रक्रियेच्या नमुद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीनुसार संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) या पदाकरीता निवड यादीमध्ये समावेश करण्यात आलेल्या उमेदवारांनी नियुक्तीकरीता त्यांचे पसंती क्रमानुसार पाच जिल्हयाचे विकल्प कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

संबधीत उमेदवारांने सादर केलेले विकल्प, प्रशासकीय आवश्यकता व गुणवत्ता विचारात घेवुन संबधीत उमेदवाराची निवड संबधीत जिल्हयाकरीता करण्यात येईल. ज्या जिल्हयामध्ये संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) या संवर्गाचे पद रिक्त नाही अशा जिल्हयाचा विकल्प संबधीत उमेदवाराने दिल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही.

संबधीत उमेदवाराची नियुक्ती कोणत्या जिल्हयात करावयाची व संबधीत उमेदवारास त्यांनी सादर केलेल्या विकल्पातील जिल्हयाव्यतिरिक्त इतर जिल्हयात नियुक्ती देण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास यांनी राखुन ठेवले आहेत. **संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) या पदावर संबधीत जिल्हयात नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांचे नियुक्तीच्या जिल्हयाबाहेर बदलीस पात्र राहणार नाही. संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) या संवर्गात नियुक्त झालेल्या व्यक्तीस त्यांचे नियुक्तीच्या जिल्हयात उपलब्ध असलेल्या कार्यक्षेत्रात/तालुक्यात काम करणे अनिवार्य राहील.**

संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुद क्रमांक 5 नुसार सदर पदावर नियुक्त केलेली उमेदवार एका वर्षाच्या कालावधीसाठी असेल.नियुक्त झालेल्या उमेदवाराने परिविक्षा कालावधी समाधानकारकरितीने पूर्ण केला नाही किंवा विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाला नाही किंवा पदासाठी योग्य असल्याचे आढळून आले नाही तर संबधित उमेदवार शासकीय सेवेतून काढुन टाकण्यास पात्र असेल.

भविष्यात संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमात/अटी व शर्तीमध्ये/नियमामध्ये वेळोवेळी करण्यात आलेले बदल सदर पदावर नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारावर बंधनकारक राहतील.

## संवर्ग- वरिष्ठ काळजी वाहक,गट-ड (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी -S-३: १६६००-५२४००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची एकूण पदे | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ |
| २ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | दिव्यांग | निरंक | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | निरंक | | | | | | | | | | | |

## संवर्ग- कनिष्ठ काळजी वाहक,गट-ड ३६ पदे (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-१: १५०००-४७६००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची एकूण पदे | ४ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ३ | १२ | ३६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | | |
| १ | सर्वसाधारण | २ | २ | १ | १ | १ | १ | १ | २ | २ | २ | ३ | १८ |
| २ | महिला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ४ | १० |
| ३ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ४ | माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| ५ | अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| ६ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ८ | दिव्यांग | १ पद दिव्यांग अल्पदृष्टी करीता राखीव आहे | | | | | | | | | | | |
| ९ | अनाथ | निरंक | | | | | | | | | | | |

**संवर्ग- स्वयंपाकी, गट- ड** (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-३:१६६००-५२४००)

| अ.क्र | प्रवर्ग | अ.जाती | अ.जमाती | विजा-अ | भज-ब | भज -क | भज ड | वि.मा.प्र | इमाव | सा.शै.मा.प. (SEBC) | आ.दु.घ (EWS) | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भरावयाची एकूण पदे | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | २ | ६ |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | |
| २ | सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |
| ३ | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ४ | खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | दिव्यांग | निरंक | | | | | | | | | | | |
| १० | अनाथ | निरंक | | | | | | | | | | | |

## शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणी व अनुभव :

जाहिराती मध्ये नमूद पदांकरीता अर्ज करण्यासाठी **दिनांक ०३-११-२०२४** रोजी पूढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव पुर्णत: धारण करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र | पदांचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | संरक्षण अधिकारी गट-ब (अराजपत्रित) | १. सांविधिक विद्यापीठाची समाज कार्य विषयामधील पदव्युत्तर पदवी धारण करणे आवश्यक राहील.<br>२. समाज कार्य विषयासंबधीत किमान तीन वर्षाचा अनुभव | S -१४: ३८६००-१२२८०० |
| २ | परिविक्षा अधिकारी,गट क | १. सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करणे आवश्यक राहील. | S-१४: ३८६००-१२२८०० |
| ३ | लघुलेखक (उच्चश्रेणी) गट-क | १. माध्यमिक शालांन्त परीक्षा(SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. लघुलेखनाचा किमान वेग 120 शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान 40 शब्द प्रति मिनीट **किंवा** मराठी टंकलेखनाचा किमान वेग 30 शब्द प्रति मिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. | S-१६:४४९००-१४२४०० |
| ३ | वरिष्ठ लिपीक /सांख्यिकी सहायक, गट-क | सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करणे आवश्यक राहील. | S-८: २५५००-८११०० |
| ४ | संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) गट-क | १. सांविधिक विद्यापीठाची कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, समाज कार्य, गृहविज्ञान किंवा पोषणआहार यापैकी कोणत्याही विषयातील पदवी किंवा शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषीत केलेली इतर कोणतीही अर्हता धारण करणे आवश्यक राहील. परंतु संविधानिक विद्यापीठाची विधी, समाजकार्य,मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र यापैकी कोणत्याही विषयातील पदव्युत्तर पदवी धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. | S-६: १९९००-६३२०० |
| ५ | लघुलेखक (निम्मश्रेणी) गट -क | १. माध्यमिक शालांन्त परीक्षा(SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. लघुलेखनाचा किमान वेग **100 शब्द प्रति मिनिट** आणि इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान 40 शब्द प्रति मिनीट **किंवा** मराठी टंकलेखनाचा किमान वेग 30 शब्द प्रतिमिनीट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. | S-१५:४१८००-१३२३०० |
| ६ | वरिष्ठ काळजी वाहक गट-ड | १. माध्यमिक शालांन्त परीक्षा(SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. उमेदवार हा सुदृढ शरीरयष्टीचा असणे आवश्यक आहे.<br>३. पुरुष उमेदवारांनी खालील शारीरिक पात्रता पूर्ण करणे अनिवार्य राहिल.<br>उंची :- किमान 163 सेंटीमीटर<br>छाती :- न फुगवता किमान 79 सेंटीमीटर | S-३: १६६००-५२४०० |
| ७ | कनिष्ठ काळजी वाहक गट-ड | १. माध्यमिक शालांन्त परीक्षा(SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. उमेदवार हा सुदृढ शरीरयष्टीचा असणे आवश्यक आहे.<br>३. पुरुष उमेदवारांनी खालील शारीरिक पात्रता पुर्ण करणे अनिवार्य राहिल.<br>उंची :- किमान 5 फुट 4 इंच<br>छाती :- न फुगवता किमान 31 इंच | S-१: १५०००-४७६०० |
| ८ | स्वयंपाकी गट-ड | १. माध्यमिक शालांन्त परीक्षा(SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे<br>२. उमेदवार हा सुदृढ शरीरयष्टीचा असणे आवश्यक आहे. | S-३: १६६००-५२४०० |

- **वयाची मर्यादा** : जाहिराती मध्ये नमूद पदांकरीता अर्ज करण्यासाठी **दिनांक ०३-११-२०२४** रोजी उमेदवाराच्या वयाची गणना करण्यात येईल.

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | खुल्या प्रवर्गासाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/पत्र क्र४०४/कार्या-१२/दिनांक २५ एप्रिल २०१६ व दिनांक ३ मार्च २०२३ मधील तरतूदी नुसार किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा** जास्त नसावे . |
| २ | मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/पत्र क्र४०४/ कार्या-१२/दिनांक २५ एप्रिल २०१६ व दिनांक ३ मार्च २०२३ मधील तरतूदी नुसार किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा** जास्त नसावे. तथापी वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड, वि.मा.प्र., इ.मा.व.,आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ईडब्लुएस), सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) या सामाजिक प्रवर्गातील **जे उमेदवारांना उन्नत व प्रगत गटामध्ये (क्रिमिलेअर) गटामध्ये मोडतात अशा उमेदवारांना ही सवलत लागू राहणार नाही.** |
| ३ | पदवीधारक अंशकालीन उमेदवारांसाठी | सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अशंका -१९१८/ प्रक्र.-५०७/१६-अ/ २ जानेवारी २०१९ मधील तरतूदी नुसार **कमाल वयोमर्यादा वय ५५ वर्षे इतकी राहील.** |
| ४ | स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य , सन १९९१ ची जनगणणा कर्मचारी व सन १९९४ नंतर निवडणूक कर्मचारी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक निवक १०१०/ प्रक्र.-०८/२०१०/१६-अ ६.१०.२०१० मध्ये दिलेल्या निर्देशा नुसार **कमाल वयोर्यादा ४५** इतकी राहील .या घटकातील **मागासवर्गीय उमेदवांराना** देखील उच्चतम वयोमर्यादा **वय वर्षे ४५** ईतकी राहील. |
| ५ | खेळाडू उमेदवारांसाठी | शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,शासन निर्णय क्रमांक राक्रिधो -२००२/प्रक्र.६८/क्रियुसे-२/ दिनांक १.७.२०१६ व तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवुन सदर पदासाठी असलेल्या विहित वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात येईल.तथापी **उच्चतम वयोमर्यादा वय वर्षे ४३** इतकी राहील. सदर घटकातील **मागासवर्गीय कर्मचारी यांना देखील उच्चतम वयोमर्यादा वय वर्षे ४३** ईतकी राहील.. |
| ६ | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक शासन निर्णय दिव्यांग २०१८/प्र.क्र ११४/१६अ दिनांक २९-५२०१९ मधील तरतूदी नुसार **सरसकट उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष** ईतकी राहील. |
| ७ | प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रकल्प -१००६/ मुस-३९६/पत्र क्र.५६ /०६/१६-अ/ दिनांक ३ फेब्रूवारी २००७ मधील तरतूदी नुसार कमाल **वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील**. सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने, **मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांना देखील कमाल वयोमर्यादा वय वर्ष ४५ ईतकी राहील.** |
| ८ | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मासेक-१०१०/ पत्र क्र.२७९/१०/१६-अ/ दिनांक २०.०८.२०१० मधील तरतूदी नुसार माजी सैनिक उमेदवारांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही **सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील** तसेच **दिव्यांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील .** |
| ९ | अनाथ | महिला व बाल विकास विभाग शासन निणर्य क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र १२२/का-०३ दिनांक ६-४-२०२३ व दिनांक १०-५-२०२३ मधील तरतूदी नुसार **किमान १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे .** |

## • ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप

१) संगणक आधारीत परीक्षेव्दारे (Computer Based Online Examination) घेण्यांत येणाऱ्या ऑनलाईन परीक्षा प्रश्नपत्रिका हया मराठी व इंग्रजी भाषेमध्ये वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाच्या घेण्यात येईल. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास ०२ गुण ठेवण्यांत आलेले आहेत.

२) ज्या पदांसाठी शारीरिक व व्यावसायिक चाचणी घेण्याची आवश्यकता नाही, अशा पदांकरीता उमेदवारांची निवड करताना संगणक आधारीत (Computer Based Examination) घेण्यात येणारी ऑनलाईन परीक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुणांची या प्रमाणे एकूण २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील.

३) लघुलेखक (उच्चश्रेणी) गट-क, लघूलेखक (निम्मश्रेणी) गट-क, स्वयंपाकी,गट-क या पदासाठी १२० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल व तदनंतर व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. १२० गुणांच्या लेखी परीक्षेमध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ३० गुणांची या प्रमाणे एकूण १२० गुणांची संगणक आधारीत परीक्षा घेण्यात येईल. जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील असे उमेदवार व्यावसायीक चाचणी साठी पात्र राहतील.लेखी परीक्षा व व्यावसायीक चाचणी यामध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या एकत्रित गुणांच्या आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार नियुक्तीकरीता शिफारस करण्यात येईल.व्यावसायीक चाचणी करीता निवड करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्याचे अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रनिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि. ०४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार उक्त नमुद पदांकरिता मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यांत येणार नाहीत.

५) उमेदवारांची निवडसूची तयार करणेसाठी तसेच ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ४ मे २०२२ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

६) परीक्षा ही Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यांत येणार आहे. विविध सत्रातील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची काठिण्य पातळी तपासण्यांत येऊन त्याचे सामान्यीकरण/समतूल्य करण्याबाबत (Normalization)संबधीत कंपनीकडून देण्यांत आलेले सूत्र वेबसाईटवर माहितीसाठी प्रकाशित करण्यात येईल.सदर (Normalization) गुणांकन पध्दत सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील याची सर्व परिक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

७) उमेदवारास एका पेक्षा अधिक पदासाठी/संवर्गासाठी अर्ज करावयाचा झाल्यास प्रत्येक पदासाठी/संवर्गासाठी स्वतंत्र अर्ज व परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक आहे.

८) चुकीच्या उत्तरासाठी उमेदवाराच्या प्राप्त गुणांमधुन कोणतेही गुण वजा केले जाणार नाहीत.

९) संगणक आधारीत (Computer Based Examination) परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील .

| अ. क्र | पदनाम/संवर्ग | ऑनलाईन परीक्षा | व्यावसायिक चाचणी | एकूण गुण | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | संरक्षण अधिकारी ,गट-ब (अराजपत्रित) | 200 | 0 | 200 | 120 मिनिट |
| 2 | परिविक्षा अधिकारी,गट-क | 200 | 0 | 200 | 120 मिनिट |
| 3 | लघुलेखक (उच्चश्रेणी),गट-क | 120 | 80 | 200 | 90 मिनिट |
| 4 | वरिष्ठ लिपीक / सांख्यिकी सहायक, गट-क | 200 | 0 | 200 | 120 मिनिट |
| 5 | संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क | 200 | 0 | 200 | 120 मिनिट |
| 6 | लघूलेखक (निम्मश्रेणी ), गट-क | 120 | 80 | 200 | 90 मिनिट |
| 7 | वरिष्ठ काळजी वाहक,गट-ड | 200 | 0 | 200 | 120 मिनिट |
| 8 | कनिष्ठ काळजी वाहक,गट-ड | 200 | 0 | 200 | 120 मिनिट |
| 9 | स्वयंपाकी, गट-ड | 120 | 80 | 200 | 90 मिनिट |

- **परीक्षेचे शुल्क**

| अ.क्र | प्रवर्ग | शुल्क (रु.) |
|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | रु.१०००/- |
| २ | मागासवर्गीय प्रवर्ग | रु.९००/- (१०% सुट) |
| परीक्षा शुल्क **ना -परतावा (Non-Refundable)** आहे. | | |

- **सरळसेवा भरती प्रक्रियेच्या कार्यपध्दती,अटी व शर्ती :**

१. प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता केवळ उक्त नमुद संकेस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीनेच भरलेला अर्ज व ऑनलाईन पध्दतीनेच भरण्यात आलेले परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील.इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज /परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येणार नाही.विहीत पध्दतीने, मुदतीत म्हणजेच दिनांक ३-११-२०२४ पर्यंत रात्री २३.५५ वाजेपर्यंत अर्ज व शुल्क सादर केलेल्या उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन संगणक आधारित परीक्षेकरीता विचारात घेण्यात येतील.विहीत मुदतीनंतर अर्ज व शुल्क सादर करण्याबाबतची लिंक बंद होईल.

२. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज /ऑनलाईन शुल्क भरण्यापुर्वी सदरच्या सविस्तर जाहिरातीचे काळजीपूर्वक अवलोकन करुन आपण सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहोत किंवा कसे याबाबतची खात्री करावी. तदनंतरच अर्ज व परीक्षा शुल्क भरावे. सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील व कोणत्याही कारणास्तव ते उमेदवारास परत करण्यात येणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना उमेदवारास परीक्षा शुल्का व्यतिरिक्त संबधीत बँकेचे नियमानुसार शुल्क/चार्जेस भरावे लागतील. खुल्या प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारास खुल्या प्रवर्गासाठी निश्चित केलेले रु.१०००/- एवढे परीक्षा शुल्क भरावे लागेल. तसेच ऑनलाईन शुल्क भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींना आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे जबाबदार राहणार नाहीत.

३. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अधिवास, जात, उन्नत प्रगत गटात मोडत नसणे, महिला, खेळामधील प्राविण्य, प्रकल्पग्रस्त, भुंकपग्रस्त, माजी सैनिक, अनाथ, दिव्यांग व इतर बाबी सिध्द करणे ही सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.यापैकी संबधीत उमेदवारास लागु असलेली/ऑनलाईन अर्जात नमुद केलेली कोणतीही बाब उमेदवार सिध्द करुन शकल्यास अशा उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या/शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यावर रद्य करण्याचे अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेले ईमेल आयडी किंवा मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण असल्यास,मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND)असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रीये दरम्यान उमेदवारांना ईमेल/एसएमएस व्दारे पाठविण्यात येणाऱ्या सूचना/संदेश/माहिती संबधित उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. तसेच ईमेल व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना आयुक्त, महिला व बाल विकास,पुणे हे जबाबदार राहणार नाहीत.

५. उक्त नमुद पदांच्या सरळसेवा भरती प्रक्रियेबाबतच्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच ऑनलाईन अर्ज सादर करावा.उमेदवारांचे अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येणार असल्याने उमेदवारांनी त्यांचे पात्रतेनुसार काळजीपूर्वक, खरी व अचूक माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रूटी राहील्याने भरती प्रक्रियेच्या /शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यांवर त्यांचा अर्ज /निवड नाकारली गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. ऑनलाईन अर्जात नमुद केलेली माहिती भरती प्रक्रियेच्या /शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यावर बदलता येणार नाही व त्याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

६. महिला व बाल विकास विभागाची सदर जाहिरात,विविध माध्यमाव्दारे प्रसारीत केलेल्या सूचना,अटी व शर्तीचा भंग करणारे अथवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने कोणताही गैरप्रकार करणारे,नियमांचे उल्लंघन करणारे, तोतयागिरी करणारे उमेदवार संपुर्ण भरतीप्रक्रियेतुन अथवा भविष्यातील सर्व भरती प्रक्रियेसाठी प्रतिरोधित (Debarred) किंवा अपात्र करण्याचे,शासकीय सेवा कोणत्याही टप्यावर समाप्त करण्याचे अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

७. उमेवाराने जाणीवपूर्वक अथवा हेतूपूरस्पर चुकीची/खोटी माहिती अथवा चूकीचे कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केल्यास अथवा खरी माहिती लपवली आहे/गैरप्रकाराव्दारे नियुक्ती मिळवली आहे असे भरती प्रक्रियेच्या /शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास संबधित उमेदवाराची झालेली निवड/शासकीय सेवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरती प्रक्रियेच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यास/दबाब आणण्याचा प्रयत्न केल्यास असे उमेदवार भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरण्यास पात्र राहतील.

८. उमेदवारास लेखी परीक्षेची संधी ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार/ माहितीनुसार देण्यात येत आहे. **परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत**.निवड यादीत समावेश करण्यात आलेल्या उमेदवारांची सदर सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीबाबत सर्व मुळ कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल.कागदपत्र पडताळणीच्या वेळी सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अटी व शर्ती नुसार/ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीनुसार विहीत कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या/ शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यावर अपात्र ठरविण्याचे/निवड रद्य

करण्याचे/नियुक्ती रदद करण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास,पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

९. उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षणाशी संबधीत कागदपत्रे व सदर जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व मुळ कागदपत्रे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या पावत्या/पोहोच विचारात घेतल्या जाणार नाहीत.छाननी अंती उमेदवारांने ऑनलाईन अर्जात सादर केलेली माहिती व प्रत्यक्ष सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये तफावत आढळल्यास /माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास संबधीत उमेदवारास निवडीकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

१०. उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये नमुद केलेली माहिती व कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली प्रत्यक्ष माहिती/कागदपत्रे यामध्ये तफावत/विसंगती आढळून आल्यास/खोटी/बनावट असल्याचे आढळून आल्यास भरती प्रक्रियेच्या /शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवाराची निवड रद्दकरण्यात येईल.तसेच उमेदवाराने मागणी केलेले सामाजिक किंवा समांतर आरक्षण या सारख्या अन्य सर्व सवलती नामंजूर करण्यात येतील.या संदर्भात उमेदवारास कोणताही दावा/हक्क सांगता येणार नाही.

११. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपूर्ण भरून विहीत मुदतीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, सरळसेवा भरती प्रक्रियेची रुपरेषा/ वेळापत्रक/ परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक/प्रवेशपत्र इत्यादीबाबतची माहिती उक्त नमुद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.उपरोक्त नमुद संकेतस्थळास भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

१२. ज्या उमेदवारांना सामाजिक व समांतर आरक्षणाचे लाभ घ्यावयाचे आहेत अशा उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात तशी मागणी नमुद करणे अनिवार्य राहील.ऑनलाईन अर्जात मागणी केली नसल्यास सदर मागणीचा विचार केला जाणार नाही.

१३. उमेदवारांनी त्यांचे नावात काही बदल केला असल्यास त्या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे /शासन अधिसूचना (गॅझेट) सादर करणे आवश्यक राहील.

१४.उमेदवारांनी पत्र व्यवहारासाठी स्वत:चा पत्ता स्पष्ट नमूद करावा.व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयंअध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शन केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

१५.ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय/अपंग कल्याण कार्यालय इ.कार्यालयाकडे नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररीत्या अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच महिला, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, माजी सैनिक व इतर समांतर आरक्षणाअंतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी देखील स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

१६. ज्या उमेदवारांचा समावेश समांतर आरक्षणाअंतर्गत निवड यादीत येईल,अशा पात्रताधारक उमदेवारांची समांतर आरक्षणासंदर्भातील कागदपत्रे संबधीत शासकीय विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणी करुन घेण्यात येतील. सदर पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

१७. सदर जाहिराती संदर्भात कोणतेही आक्षेप/निवेदन असल्यास त्याबाबतचे लेखी निवेदन आवश्यक त्या कागदपत्रांसह/ पुराव्यासह सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आंत आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे ,पत्ता- २८ राणीचा बाग,व्हीव्हीआयपी सर्किट हाऊस शेजारी,पुणे ४११००१ या पत्त्यावर सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप/निवेदन विचारात घेतले जाणार नाहीत.

१८. उक्त भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरलेल्या उमेदवारांना स्वतंत्ररीत्या कळविण्यात येणार नाही

१९. उमेदवारांनी प्राधान्य क्रमाने तीन परीक्षा केंद्राची नावे ऑनलाईन अर्जात नमुद करावीत.त्यानुसार उमेदवारास त्यांनी नोंदविलेल्या तीन परीक्षा केंद्रापैकी एक परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तथापी ऑनलाईन अर्जात नमूद परीक्षा केंद्रासाठी आवश्यक असलेल्या किमान उमेदवारांची नोंदणी न झाल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव प्रशासकीय अथवा इतर कोणत्याही कारणास्तव सदर परीक्षा केंद्रावर परीक्षा घेता येणार नसल्यास सदर उमेदवारांना उपलब्धतेनुसार अन्य कोणत्याही परीक्षा केंद्रावर परिक्षेसाठी वर्ग करण्यात येईल. उमेदवारास कोणते परीक्षा केंद्र दयावे याबाबत तसेच कोणतेही केंद्र बदलण्याचा/वाढविण्याचा अथवा कमी करणे याबाबत महिला व बाल विकास विभागाचा व संबधित कंपनीचा निर्णय अंतिम राहील. उमेदवाराने निवड केलेल्या केंद्रावर क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांची नोंदणी झाल्या कारणामुळेही उमेदवारास इतर परीक्षा केंद्रावर वर्ग करण्यात येईल.उमेदवाराने परीक्षा केंद्र/परिक्षेचे स्थळ/तारीख/सत्र बदलण्याची केलेली विनंती मान्य केली जाणार नाही.ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेश पत्रावर परीक्षा केंद्राचा पत्ता, परीक्षेची तारीख,वेळ व इतर माहिती नमुद करण्यात येईल.

२०. व्यावसायिक चाचणीसाठी पात्र उमेदवाराची चाचणी परीक्षा यथावकाश घेण्यात येईल त्या संदर्भातील स्थळ,तारीख व वेळेबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. गट-ड संवर्गातील कनिष्ठ काळजी वाहक व वरिष्ठ काळजी वाहक या पदासाठी निवड यादीमध्ये समावेश केलेल्या उमेदवाराची जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार शारिरीक पात्रता पडताळणी कागदपत्र पडताळणीच्या वेळी करण्यात येईल.

२१. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेस व व्यावसायिक परीक्षेस स्वखर्चाने व स्वत:च्या जोखीमवर उपस्थित रहावे. महिला व बाल विकास विभाग कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस किंवा हानीस जबाबदार राहणार नाही.

२२. **परिक्षेस उपस्थित राहण्यासाठी केवळ महिला व बाल विकास विभागा मार्फत जारी केलेले वैध प्रवेश पत्र ग्राहय धरण्यात येणार असल्याने ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराने सदर प्रवेश पत्र सोबत बाळगणे अनिवार्य आहे**.संबधीत उमेदवारास परीक्षेचे प्रवेश पत्र उक्त नमुद संकेस्थळावरील स्वतंत्र लिंक व्दारे उपलब्ध करुन दिले जाईल.सदरचे प्रवेश पत्र संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन परीक्षेच्या वेळी सोबत बाळगण्याची सर्वस्वी जबाबदारी उमदेवाराची राहील.परीक्षेचे प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने पाठविण्यात येणार नाही.

२३. परीक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबधीत विविध प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी अर्जदाराने परीक्षेच्या विहीत वेळेपुर्वी किमान १.०० तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित रहाणे आवश्यक आहे.ऑनलाईन परीक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परीक्षेस बसु दिले जाणार नाही.विहीत वेळेत व परीक्षा केंद्राच्या अचूक पत्त्यावर पोहचण्याची जबाबदारी ही उमदेवाराची राहील.याबाबत कोणताही दावा/हक्क उमेदवारास सांगता येणार नाही.

२४. **ऑनलाईन परीक्षेच्या वेळी महिला व बाल विकास विभागाच्या प्रवेशपत्रासह खालील पैकी एका मूळ ओळखपत्राची प्रत उमेदवाराने स्वत:जवळ बाळगणे अनिवार्य आहे**. ऑनलाईन परीक्षेच्या वेळी स्वत:ची ओळख पटविण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील. उमेदवार स्वत:ची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास/उमेदवाराच्या ओळखीबाबत शंका उपस्थित झाल्यास उमेदवारास परीक्षेस बसु दिले जाणार नाही.

| अ.क्र | ओळखपत्राचे विवरण |
|---|---|
| १ | पासपोर्ट |
| २ | पॅन कार्ड |
| ३ | वाहन परवाना |
| ४ | मतदार ओळखपत्र |
| ५ | बँक पासबुक |
| ६ | सांविधिक विद्यापिठ/महाविदयालय यांचे ओळखपत्र |
| ७ | शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कर्मचारी ओळखपत्र |
| ८ | आधार कार्ड |
| टिप- शिधापत्रिका (रेशन कार्ड)व शिकाऊ वाहन परवाना हा उमेदवाराची ओळखपत्र पटविण्यासाठी वैध पुरावा मानण्यात येणार नाही. व ते ग्राहय धरले जाणार नाही याची नोंद उमेदवारांनी घ्यावी | |

२५.भरती प्रक्रियेस विलंब होणे,परीक्षा पूर्णपणे रद्द होणे अथवा निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होणे याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत परीक्षा वेळेत पार पाडण्याचे/परीक्षा पुन्हा सुरु करण्याचे/निवड प्रक्रिया पुन्हा राबविण्याबाबतचे /भरती प्रक्रियेमध्ये अंशत: अथवा पुर्ण बदल करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास,म.रा.पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

२६.परीक्षा कक्षात गणकयंत्र, आयपॅड मोबाईल/पेजर/ब्ल्युटुथ किंवा इतर कोणत्याही दूरसंचार/ईलेक्ट्रोनिक संपर्काची साधने घेवून जाण्यास/सोबत बाळगण्यास परवानगी नाही.

२७.सदर भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर भरती प्रक्रियेच्या जाहिरातीत किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशत: किंवा संपुर्ण बदल करण्याचे तसेच जाहिरातीमधील काही भाग अंशत: किंवा पुर्णपणे रदद करणे, जाहिरातीमध्ये नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास यांनी राखून ठेवले आहेत.

- **सामाजिक व समांतर आरक्षणाशी संबधित अटी व शर्ती :**

उक्त भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण किंवा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे,सामाजिक, समांतर, दिव्यांग व इतर आरक्षणामध्ये संवर्गनिहाय/ पदनिहाय बदल करण्याचे, सरळसेवा भरती प्रक्रियेच्या जााहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे/नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे/अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी राखुन ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.त्याबाबत उमेदवारांस कोणताही दावा/हक्क सांगता येणार नाही.

१. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.उमेदवारास अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास वैध असलेले सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन प्रदान करण्यात आलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२. सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने, आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास वैध असलेले सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्रदान करण्यात आलेले जातीचा दाखला व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र बीसीसी-२०११/प्र.क्र१०६४/२०११/१६ब दि.१२-१२-२०११ नुसार ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागेवर झाली आहे तथापि, जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांना त्यांचे जात प्रमाणत्राची वैधता तपासणीच्या अधिन राहुन संबधिताची नियुक्ती देण्यात येईल.तथापि नियुक्ती आदेश प्राप्त झालेल्या उमेदवारांनी त्यांचे नियुक्तीच्या दिनांकापासुन ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबधित जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहील. ६ महिन्यांच्या आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास उमेदवार असमर्थ ठरल्यास अथवा जात पडताळणी समितीने/सक्षम प्राधिकाऱ्याने जात प्रमाणपत्र अवैध ठरवल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती/निवड तात्काळ रद्द करण्यात येईल तसेच संबधीत उमेदवारा विरोधात आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४. इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन शुध्दीपत्रक क्र संकीर्ण-२०२३/प्र.क्र७६/मावक दि.९-३-२०२३ नुसार **अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना वगळून उर्वरीत मागास प्रवर्गातील उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या विहीत केलेली अंतिम तारीख ज्या वित्तीय वर्षात येते त्या वित्तीय वर्षाचे म्हणजेच सन २०२४-२५ चे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले प्रगत गट /व्यक्तीमध्ये (नॉन-क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या** वेळी सादर करणे आवश्यक राहील.

५. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र राआधो-२०१९/प्र.क्र३१/१६ अ दि.१२-२-२०१९ व राआधो-४०१९/प्र.क्र३१/१६अ दि.३१-५-२०२१ मध्ये विहीत केल्यानुसार अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास वैध असलेले व महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी जारी केलेले आर्थिकदृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६. सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४ च्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रबीसीसी-२०२४/प्र.क्र७५/आरक्षण-५दि.५-७-२०२४ नुसार विहीत नमुण्यातील जात प्रमाणपत्र व नॉनक्रिमीलेअर (उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

- **समांतर आरक्षणासंदर्भातील अटी व शर्ती :**

समांतर आरक्षणा संदर्भातील नियुक्तीबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र राआधो ४०२४/प्र.क्र१४/१६ अ दिनांक २५-१-२०२४ नुसार कार्यवाही करण्यात येईल. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता (सामाजिक अथवा समांतर अथवा सोयीसवलीचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबधीत कायदा/नियम/आदेशानुसार) विहीत नमुण्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकापुर्वीचे सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध असणारे प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे. समांतर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवुन संबधीत उमेदवाराच्या निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

- **महिला आरक्षण :-**

१. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र ८२/२००१/मसेआ/प्र.क्र४१५/का-२ दि.२५-५-२००१ व त्याबाबतीत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार महिला आरक्षण राहील.

२. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र मविआ-२०२३/प्र.क्र१२३/कर-२ दि.४-५-२०२३ नुसार खुला प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर निवड झालेल्या खुला किंवा मागासवर्गीय महिला उमेदवारास ते प्रगत गट /व्यक्तीमध्ये (नॉन-क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबतची अट रद्द करण्यात आलेली आहे.

३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुला या संवर्गाच्या महिला या समांतर आरक्षणाकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता अर्ज करणाऱ्या महिला उमेदवार वगळून उर्वरीत इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर दावा करु इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या विहीत केलेल्या अंतिम तारीख ज्या वित्तीय वर्षात येते त्या वित्तीय वर्षाचे म्हणजेच सन २०२४-२५ चे महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले प्रगत गट /व्यक्तीमध्ये (नॉन-क्रिमिलेअर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाची सवलत हवी आहे अशा महिला उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात तसे स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.

५. निवड झालेल्या महिला उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडुन पडताळणी करण्यात येईल व पडताळणीच्या अहवालाच्या आधारे संबधीत उमेदवाराच्या निवडीबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात येईल.

- **माजी सैनिक :-**

१. **उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांना माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.**

२. **गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी** जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड झालेल्या माजी सैनिक \उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम प्राधिकाऱ्याकडुन पडताळणी

करण्यात येईल व पडताळणीच्या अहवालाच्या आधारे संबधीत उमेदवाराच्या निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक .आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६अ दि.२-९-१९८३ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**अ)**

माजी सैनिकासाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्यक्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

**आ)**

युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यु झालेल्या किंवा अपंगत्व येवुन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने १५% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर नियुक्तीस पात्र राहतील.तथापी सदर उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाची शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

३. माजी सैनिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे

- **प्रकल्पग्रस्त :-**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एइएम-१०८०/३५/१६-अ दि.२१-१-१९८० तसेच या संदर्भात शासनाकडुन वेळोवेळी नमुद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र भूंकप-१००९/प्र.क्र२०७/२००९/१६अ दि.२७-८-२००९ मधील गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील प्रकल्पग्रस्त असले बाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. निवड सुचीमध्ये समावेश केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्राची संबधीत सक्षम प्राधिकाऱ्याकडुन पडताळणी करून घेतले जाईल .सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. प्रकल्पग्रस्त आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे

- **भुकंपग्रस्त :-**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.भुकंप १००९/३५/१६-अ/ दिनांक २७ ऑगस्ट २००९ तसेच या संदर्भात शासना कडून वेळो वेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार भुकंपग्रस्त आरक्षण राहील गुणवतायादीमध्ये येणाऱ्या भुकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील भुकंपग्रस्त असले बाबतचे शासकीय नोकरी मिळण्यासाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.निवड सुचीमध्ये समावेश केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्रची हे संबधीत सक्षम प्राधिकाऱ्याकडुन पडताळणी करून घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना निवडीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. भुकंपग्रस्त आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे.

- **पदवीधर अंशकालीन :-**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.पअंक-२००९/ पत्र क्र.२००/२००९/ कार्या-१६-अ दिनांक २७ ऑक्टोबर २००९ व क्र. अंशंका-१९१३/ प्रक-५७/ २०१३/१६-अ/ दिनांक १९ सप्टेंबर २०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षा पर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची रोजगार

मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. पदविधर अंशकालीन या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवाराचे पदविधर अंशकालीन आरक्षणासंबधीची कागदपत्रांची पउताळणी सक्षम प्राधिकारीकडून करुन घेण्यात येईल.सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्राप्त अहवालानुसार संबधीत उमेदवाराच्या नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल. पदविधर अंशकालीन आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे

- **खेळाडू आरक्षण :-**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक सकीर्ण -१७१४/प्रकरण क्र ३२५/क्रीयुसे-२ दि.२२-४-२०१५,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२/दिनांक १ जुलै २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२ / प्र.क्र.६८ /क्रीयुसे-२/ दिनांक १८/०८/२०१६,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र६८/क्रीयुसे-२ दि.१० आक्टोबर २०१७, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक संकीर्ण - १७१६/प्र.क्र.१८ / क्रीयुसे-२ दिनांक ३०/०६/२०२२ नुसार व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षाणाचा दावा करणा-या उमेदवाराच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३. विहित दिनांकास खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच संबधित खेळाडू उमेदवार हा खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करिता पात्र ठरतो/नाही या विषयाच्या पडताळीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबधित सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडे परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे.अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवार हा एकाच वेळेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोच पावतीसादर केली नसल्यास, संबधित उमेदवाराचा खेळाडूकरीता आरक्षित पदावर विचार करण्यात येणार नाही.

५. परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्या बाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्या बाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूंसाठी आरक्षित पदांवरील निवडी करिता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्यपत्र पडताळणी बाबतचा वैध अर्ज सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षीत पदावर शिफारस नियुक्ती करिता विचार करण्यात येईल.खेळाडु आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे. खेळाडू या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवाराचे खेळाडू आरक्षणासंबधीची कागदपत्रांची पउताळणी सक्षम प्राधिकारीकडून करुन घेण्यात येईल.सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्राप्त अहवालानुसार संबधीत उमेदवाराच्या नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

## ▪ अनाथ आरक्षण :

१. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र१८२/का-३ दि.23-8-2021, शासन निर्णय अनाथ-२०२२/ पत्र क्रमांक-१२२/कार्या-०३/ दिनांक ६ एप्रिल २०२३ व सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दिनांक १० मे २०२३ नुसार अनाथ आरक्षणाची अंमलबजावणी दिव्यांग आरक्षणाच्या धर्तीवर करण्यात येईल. तसेच यासंदर्भात शासना कडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार अनाथ व्यक्तीचे आरक्षण लागू राहील.तसेच एखादया भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या माध्यमातुन अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागावर गुणवत्ते नुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

२. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभागा कडील शासन निर्णय क्र. अनाथ-२०१८/पत्र क्र-१८२/ कपार्या-३/ दिनांक ६ सप्टेंबर २०२२ तसेच दिनांक ६ एप्रिल २०२३ अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करते वेळी महिला व बाल विकास विभागा कडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणेकडून वितरीत करण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही .

३. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग शासन निर्ण क्रमांक अनाथ-२०२२/ पत्र क्रमांक-१२२/कार्या-०३/ दिनांक ६ एप्रिल २०२३ मधील तरतुदीनुसार अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास अनूसूचित जाती या प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेले शैक्षणिक शुल्क ,परीक्षा शुल्क,किमान गुणवत्ता पात्रता आणि वयोमर्यादा इत्यादी निकष लागु राहतील.

४. अनाथ आरक्षणाचा लाभ घेउन शासन सेवेत रूजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत आयुक्त, महिला व बाल विकास विभाग पुणे यांचे कडून अनाथ प्रमाणपत्र याबाबतची पडताळणी करून घेण्याची जबाबदरी संबंधित नियुक्ती प्राधिकारी / विभाग प्रमूख यांची राहील .

५. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्ते नुसार निवड झालेले उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्याच प्रवर्गातून करण्यात येईल .

६. ऑनालाईन अर्जाव्दारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांचेकडे सदयस्थितीत उपलब्ध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.तसेच दिनांक 23-8-2021 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. अनाथ आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तेता करणे अनिवार्य आहे

## ▪ दिव्यांग आरक्षण व मार्गदर्शक सूचना :-

१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.दिव्यांग-२०१८/पत्रक्र ११४/१६-अ/दिनांक २९ मे २०१९ , महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०१९/प्र.क्र.७९/ का-७/ मंत्रालय मुंबई दि. ५ जुलै २०२१ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र -दिव्यांग-२०१९/प्रक्र ७९/का-७ दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करणेत आले आहेत. त्यानुसार दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती उमेदवार दिव्यांग आरक्षीत पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत.

३. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण मंजुर पदसंख्येपैकी असतील.

४. दिव्यांग व्यक्तीची संबधित संवर्ग पदाकरीता पात्रता शासनाकडुन वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबधीत उमेदवाराने सदर आरक्षणासंदर्भात शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे अनिवार्य आहे

५. दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवाराचा सामाजिक प्रवर्ग विचारात न घेता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

६. उमेदवाराने अर्जात नमुद केलेल्या दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमाण ४० % दिव्यांगाचे प्रमाणपत्र धारक असणे आवश्यक आहे.

७. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेच्या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रकि-२०१८/प्रक्र-४६/ आरोग्य-६/ दिनांक १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशा नुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगण्कीय प्रणाली व्दारे वितरित करण्यात आलेले नविन/अद्यावत नमून्यातील दिव्यांगत्वाचे नविन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. शासन परिपत्रक,दिव्यांग कल्याण विभाग,क्रमांक दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनांक २७ जुन, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या /येणा-या वैद्यकिय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती/योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील. दिव्यांग उमेदवारांनी अर्ज करताना शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक दिव्यांग -२०२४ / प्रक्र८६/दि.क.२ दिनांक २७जुन, २०२४ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे. त्यातील तरतुदींनुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

९. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग -2019/प्र.क्र200/दि.क.2 दि.5-10-2021 मधील तरतुदीनुसार लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या 1.अंधत्व 2.शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बधीत/ नसलेले) 3.मेंदुचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग परिक्षार्थींना लेखनिक/वाचक यांची सुविधा घेण्यास पात्र राहतील.**लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या इतर प्रकारातील दिव्यांग परिक्षार्थींच्या बाबतीत,संबधित दिव्यांग व्यक्तीने लेखनिक/वाचक पुरविणे आवश्यक असल्याचे शासकीय रुग्णालयातील मुख्य वैदयकीय अधिकारी,जिल्हा शल्य चिकीत्सक/वैदयकीय अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले उक्त नमुद शासन निर्णयात नमुद Appendix-I प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे प्रत्यक्ष परिक्षेच्या वेळी आवश्यक राहील**.

१०. **उक्त नमुद दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांनी लेखनिकाची व्यवस्था स्वता: करावयाची आहे**.संबधित लेखनिक/वाचक यांची शैक्षणिक पात्रता ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे अशा पदाकरीता घेण्यात येणाऱ्या किमान शैक्षणीक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी.लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग -2019/प्र.क्र200/दि.क.2 दि.5-10-2021 मध्ये नमुद विहीत नमुन्यात **Appendix-II** लेखनिक/वाचक

याची माहिती परिक्षेच्या वेळी समवेक्षक/केंद्र प्रमुख यांना सादर करणे अनिवार्य राहील. दिव्यांग उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या लेखनिक/वाचकालाच प्रत्यक्ष लेखी परीक्षेच्या वेळी परीक्षाकक्षात सोबत ठेवण्यास परवानगी देण्यात येईल.ऐनवेळी लेखनिक/वाचक बदलण्याची परवानगी कोणत्याही परिस्थितीत देण्यात येणार नाही, व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील याची नोंद घ्यावी.

११. लेखनिकाची मागणी करणाऱ्या आलेल्या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी संबधित परीक्षा केंद्राचे केंद्र प्रमुख/समवेक्षक यांचेकडे दिव्यांगत्व संबधीतचे मुळ प्रमाणपत्रे पडताळणीकरीता सादर करणे आवश्यक आहे.तसेच लेखनिकाची मदत घेण्याऱ्या उमेदवाराने लेखनिकासह दयावयाचे विहीत नमुण्यातील प्रमाणपत्र (लेखनिकाच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोसह) परीक्षा केंद्राचे केंद्र प्रमुख/समवेक्षक यांचेकडे परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.तसेच लेखनिकाने परीक्षाकेंद्रावर स्वता:ओळख पटविण्यासाठी सदर जाहिरातीमधील सरळसेवा भरती प्रक्रियेच्या कार्यपध्दती,अटी व शर्ती मधील अट क्र २४ मध्ये नमुद कोणतेही एक मुळ ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे

१२. लेखनिकाबाबतच्या सविस्तर सुचना व उक्त नमुद **Appendix-I, Appendix-II व नमुना1 संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे**.

१३. अनुग्रह कालावधी- लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेच्या निर्धारीत वेळेपेक्षा ४५ मिनीटे भरपाई वेळ देण्यात येईल

१४. दिव्यांग उमेदवाराने त्यांना लेखनिकाची आवश्यकता असल्याबाबत ऑनलाईन अर्जात तसे स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.ऐनवेळेस कोणत्याही दिव्यांग उमेदवारास लेखनिक उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

## ■ नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१. संरक्षण अधिकारी गट ब (अराजपत्रित) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपुर खंडपीठ येथे दाखल पुनर्विलोकन अर्ज 2551/22 इन ओ.ए.नंबर 767/17 च्या निकालाच्या अधिन राहुन प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. उक्त नमुद करण्यात आलेली लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क या संवर्गाचे 1 पद एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, नवी मुंबई या कार्यालयात मंजुर असून लघुलेखक (उच्चश्रेणी), गट-क पदाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारास एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, नवी मुंबई या कार्यालयातच नियुक्ती देण्यात येईल. सदर पदावर नियुक्त करण्यात आलेला उमेदवार इतर कार्यालयात/जिल्हयात/ठिकाणी बदलीस पात्र राहणार नाही.

३. उक्त नमुद करण्यात आलेली लघुलेखक (निम्नश्रेणी), गट-क या संवर्गाची पदे महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे व एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,रायगड भवन, नवी मुंबई या दोनच कार्यालयातच मंजुर आहेत. सदर पदावर नियुक्त करण्यात उमेदवार उक्त नमुद कार्यालया व्यतिरीक्त इतर कार्यालयात/जिल्हयात/ठिकाणी बदलीस पात्र राहणार नाही.

४. उक्त नमुद वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहायक या संवर्गाची पदे महिला व बाल विकास आयुक्तालय स्तरावरुन भरण्याबाबत शासनाने पत्र क्र मबाआ-2021/प्र.क्र83/का-7 दिनांक 2-3-2023 नुसार मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सदर संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात नमुद करण्यात आलेली आहे.

५. महिला व बाल विकास विभाग अधिसूचना दिनांक १६-६-२००६ अन्वये उपरोक्त नमुद गट-ड संवर्गातील पदांना अत्यावश्यक सेवेतील पदे घोषीत केलेली आहेत. जनहित याचिका क्र २८/२०१४-भारतीय स्त्री शक्ती

संघटना विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या न्यायालयीन प्रकरणात मा.उच्च न्यायालय,खंडपिठ नागपुर यांनी दिलेले आदेश विचारात घेता, महिला व बाल विकास विभाग शासन पत्र क्र मबाआ-२०२१/प्र.क्र२२/का-७ दिनांक १९-९-२०२४ अन्वये गट-ड संवर्गातील उक्त नमुद संवर्गाची एकूण ४६ पदे भरण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे.त्यानुसार महिला व बाल विकास विभागाकडील गट-ड संवर्गातील पदांचा समावेश सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये करण्यात आलेला आहे.

६. उमेदवाराने ते महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र)नियम 2005 मधील तरतुदीनुसार ते लहान कुटंबाच्या व्याखेची पुर्तता करतात याबाबतचे प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

७. उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर संबधीत उमेदवाराने मराठी व हिंदी भाषा परीक्षासंदर्भात वेळोवेळी केलेल्या नियमानुसार विहीत मुदतीत दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा भाषा परीक्षाउत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे आवश्यक राहील.

८. शासकीय सेवेत नियुक्त केलेल्या उमेदवारास त्याच्या पदाशी संबधीत सेवाप्रवेश नियमातील सर्व नियमांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.तसेच त्यांना सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर नियुक्तीच्या पदाकरीता विहीत करण्यात आलेल्या विभागीय परीक्षा नियमानुसार विहीत मुदतीत विभागीय परीक्षा (पदावर कायम होण्यासाठी घेण्यात येणारी विभागीय परीक्षा/वरिष्ठ पदावर पदोन्नतीसाठी अर्हता म्हणून घेण्यात येणारी विभागीय परीक्षा) उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०. उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

११. संबधीत उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा (कालबध्द प्रशिक्षण) नियम 2022 नुसार त्यांचे पदास लागु असलेले प्रशिक्षण विहीत कालावधीत पुर्ण करणे बंधनकारक राहील

१२. ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड सामाजिक आरक्षणाअंतर्गत झालेली आहे, अशा उमेदवारांनी त्यांचे नियुक्तीच्या दिनांकापासुन 6 महिन्यांच्या कालावधीत त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१३. संबधित उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर विहीत मुदतीत चारित्र्य पडताळणी दाखला व शारिरीक पात्रता दाखला संबधित सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. चारित्र पडताळणी अहवाल किंवा शारिरीक पात्रता अहवाल प्रतिकूल असल्यास संबधीत उमेदवार त्यांची नियुक्ती/शासकीय सेवा समाप्त करण्यास पात्र राहतील.

१४. नियुक्ती झालेल्या उमेदवारास राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना/एकिकृत निवृत्ती वेतन योजना व त्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा/तरतुदी लागू राहतील.

१५. नियुक्त केलेल्या उमेदवारास शासनाने/नियुक्ती प्राधिकाऱ्याने/कार्यालय प्रमुखांनी वेळोवेळी सोपविलेले सर्व शासकीय कामकाज विहीत वेळेत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

१६. उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरीक्त महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अटी/ शर्ती/ नियम/ अधिसूचना यांची विहीत मुदतीत पुर्तता करण्याची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील.

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता :-** | महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>२८ राणीचा बाग,व्ही.व्ही.आय.पी. सर्किट हाऊस शेजारी,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कार्यालय परिसर,<br>पुणे - ४११००१ दुरध्वनी कमांक ०२०-२६३३७११७<br>कार्यालयाची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५<br>(दर शनिवार/रविवार व शासकीय सुटटीच्या दिवशी कार्यालय बंद राहील) |
| ऑनलाईन अर्ज भरताना तांत्रिक अडचणीकरीता कॉल सेंटरचा टोल फ्री क्रमांक -<br>**७३ ५३ ०० ९० ९४** (वेळ सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) | |

**स्थळ** :- पुणे
**दिनांक** :- १४ / १० / २०२४

11-10-2024

**(डॉ.प्रशांत नारनवरे)** (भा.प्र.से
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**